दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
Web portal : hinduprakashwarta.com
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ शनिवार, दि. ०८ ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १०९ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

### न्यायालयाचा मनाई आदेश असतानाही जमीन परस्पर विक्रीचा प्रकार

**छत्रपती संभाजीनगर :** जमिनीची इसार पावती केलेली असताना आणि न्यायालयाने सदर जमिनीबाबत मनाई हुकूम दिलेला असताना देखील, तो हुकूम धाब्यावर बसवून ती जमीन परस्पर दुसऱ्या व्यक्तींना विक्री करून विश्वासघात व फसवणूक केल्याप्रकरणी सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणातील शेख जब्बार शेख अब्दुल (वय ५४ वर्षे, रा. देवळाई, छत्रपती संभाजीनगर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून सातारा पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### सफाई कामगारांना सदनिकांचा लाभ द्यावा; मुकेश सारवान यांचे निर्देश

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष मुकेश सारवान यांनी गुरुवारी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस भेट देऊन सफाई मजुरांच्या समस्या जाणून घेतल्या आणि प्रशासनाला विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी सक्त निर्देश दिले आहेत. मनपा मुख्यालय येथे आयोजित या आढावा बैठकीत प्रशासकीय अधिकारी व विविध कामगार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीस मनपा आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे, शहर अभियंता संजय कोंबडे, उपायुक्त नंदकिशोर भोंबे, उपायुक्त अपर्णा थेटे, उपायुक्त विकास नेवाळे, अंकुश पांढरे, अभय प्रामाणिक, कार्यकारी अभियंता अमोल कुलकर्णी यांच्यासह कामगार संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात वार्ता

### सफाई कामगारांचा परिविक्षाधीन कालावधी सहा महिन्यांचा करावा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकांमधील सफाई कामगारांवर लागू असलेला दोन वर्षांचा लांबलेला परिविक्षाधीन कालावधी पूर्णपणे रद्द करून तो तातडीने सहा महिन्यांचा करण्यात यावा आणि याच कालावधीत सर्व आर्थिक लाभ व सेवा-सुविधा कर्मचाऱ्यांना देण्यात याव्यात, अशी ठाम व महत्त्वाची मागणी लहु प्रहार संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील एक सविस्तर निवेदन महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष मुकेशजी सारवान यांच्याकडे अधिकृतपणे सुपूर्द करण्यात आले. या शिष्टमंडळामध्ये लहु प्रहार संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष संतोष पवार, राज्य कार्याध्यक्ष कचरु कांबळे, राज्य संघटक मच्छिंद्र बहिलम, मराठवाडा अध्यक्ष आनंद लोखंडे आणि जिल्हाध्यक्ष समाधान इंच्चे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### 'विकसित मराठवाडा-2030' कृती आराखडा आणि प्रादेशिक बैठक

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** स्मार्ट सिटी कार्यालयात विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या प्रादेशिक विभाग प्रमुखांच्या महत्त्वाच्या बैठकीत 'विकसित मराठवाडा-२०३०' धोरणाची अंमलबजावणी वेगाने करण्याचे निर्देश देण्यात आले. मुख्यमंत्र्यांच्या 'विकसित महाराष्ट्र' संकल्पनेच्या धर्तीवर मराठवाड्याची 'मागास भाग' ही प्रतिमा बदलून विकासाचे नवे पर्व सुरू करण्यासाठी सर्व विभागांनी एकात्मिक व समन्वयाने कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. विभागांच्या अडीअडचणी तातडीने दूर करण्यासाठी विशेष "वॉर रूम" स्थापन करण्यात येणार असून, मंत्रालय स्तरावरील अडचणींसाठी थेट व्हॉट्सॲपवर संपर्क साधण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### सबळीकरण योजनेसाठी शेतजमीन विक्री प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** परभणी जिल्ह्यामध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांमधील भूमिहीन, दारिद्र्यरेषेखालील शेतमजुरांना ०४ एकर कोरडवाहू किंवा ०२ एकर बागायती शेतजमीन देण्यात येते. शेतजमीन विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना कोरडवाहू शेतजमिनीसाठी प्रति एकर ५ लाख रुपयांच्या मर्यादेपर्यंत, तर बागायती शेतजमीन विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति एकर ८ लाख रुपयांच्या मर्यादेपर्यंत जिल्हास्तरीय समितीमार्फत वाटाघाटी करून शेतजमीन विक्रीचा मोबदला दिला जातो.

### परभणीत 'स्थानिक निधी लेखापरीक्षा दिन' साजरा

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** 1 ऑगस्ट हा दिवस "स्थानिक निधी लेखापरीक्षा दिन" म्हणून साजरा करण्यास येतो, त्यानुसार, सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, परभणी जिल्हा कार्यालयात दुसरा "स्थानिक निधी लेखापरीक्षा दिन" विविध सामाजिक उपक्रम राबवून उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपसंचालक तथा मुख्य लेखाधिकारी (महानगरपालिका) येथील डॉ. प्रकाश दासे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त उपसंचालक तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी लक्ष्मण जाधव तसेच सेवानिवृत्त उपसंचालक तथा मुख्य लेखाधिकारी डॉ. प्रभाकर काळदाते उपस्थित होते.




# 'संपर्क, संवाद आणि समाधान'मधून नागरिकांना तत्पर सेवा द्या

## विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांचे महसूल प्रशासनाला आवाहन; उत्कृष्ट अधिकारी-कर्मचारी, सेवानिवृत्त अधिकारी व गुणवंत पाल्यांचा गौरव

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** बदलत्या काळानुसार नागरिकांच्या शासकीय सेवांबाबतच्या अपेक्षाही बदलत आहेत. नागरिकांना जलद, सुलभ आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महसूल प्रशासनाने पारंपरिक कार्यपद्धतीत आवश्यक बदल करून नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा. 'संपर्क, संवाद आणि समाधान' या त्रिसूत्रीच्या आधारे नागरिकांना तत्पर आणि लोकाभिमुख सेवा द्यावी, असे आवाहन विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी केले.

महसूल दिनानिमित्त महात्मा गांधी मिशन महाविद्यालयातील रुख्मिणी सभागृहात आयोजित अधिकारी-कर्मचारी गौरव समारंभात ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., पोलीस आयुक्त प्रवीण पवार, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्नू पी.एम. तसेच पोलीस अधीक्षक (ग्रामीण) प्रकाश जाधव यांच्यासह महसूल प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

महसूल विभाग हा शासन व्यवस्थेचा महत्त्वाचा कणा असून शासन आणि सर्वसामान्य नागरिकांना जोडणारी महत्त्वाची यंत्रणा आहे. त्यामुळे प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्याने आपल्या जबाबदारीचे महत्त्व ओळखून नागरिककेंद्री दृष्टिकोनातून काम करणे आवश्यक आहे, असे श्रीकांत यांनी सांगितले.

नागरिकांना शासकीय सेवांसाठी वारंवार कार्यालयात येण्याची गरज भासू नये. शक्य तितक्या सेवा घराजवळ अथवा तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्याची व्यवस्था निर्माण करावी. 'शासन आपल्या दारी' ही संकल्पना प्रत्यक्ष सेवेत उतरली पाहिजे. केवळ स्मार्टफोनचा वापर म्हणजे स्मार्ट प्रशासन नव्हे, तर नागरिकांना सेवा किती सुलभ, जलद आणि पारदर्शक पद्धतीने दिली जाते, यावर प्रशासनाची कार्यक्षमता ठरते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

अधिकारी-कर्मचाऱ्यांनी नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवून सकारात्मक संवाद साधावा आणि त्यांच्या प्रश्नांचे वेळेत समाधान करावे. नागरिकांना त्यांच्या हक्काच्या सेवांसाठी आंदोलन अथवा उपोषण करण्याची वेळ येऊ नये. नियमानुसार मिळणाऱ्या सेवा अनावश्यक पाठपुरावा न करता वेळेत मिळाल्या पाहिजेत. अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सन्मान त्यांच्या पदामुळे नव्हे, तर त्यांच्या कामातून निर्माण झाला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

**विभागांमध्ये समन्वयाची कार्यसंस्कृती मजबूत करा**

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी नागरिकांसाठी शासन म्हणजे कोणताही एक विभाग नसून संपूर्ण प्रशासन असल्याचे सांगितले. महसूल, कृषी, पोलीस किंवा अन्य कोणत्याही विभागाशी नागरिकांचा प्रश्न संबंधित असला तरी त्यांचे काम वेळेत होणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे जबाबदारी एकमेकांकडे ढकलण्याऐवजी 'होल ऑफ गव्हर्नमेंट' दृष्टिकोनातून सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे त्यांनी सांगितले.

विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण, आपत्ती व्यवस्थापन, निवडणूक प्रक्रिया, अतिक्रमण तसेच जमीनविषयक कामे अनेक विभागांच्या समन्वयातून पूर्ण होतात. त्यामुळे वरिष्ठ स्तरापासून क्षेत्रीय स्तरापर्यंत समन्वयाची कार्यसंस्कृती अधिक मजबूत करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी महसूल विभागाच्या कार्याचे कौतुक करताना आपत्ती व्यवस्थापन, पंचनामे, मदत वाटप, निवडणूक प्रक्रिया आणि विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत महसूल प्रशासनाची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. अधिकारी-कर्मचाऱ्यांनी शासकीय जबाबदाऱ्यांसोबत स्वतःचे आरोग्य, कुटुंब आणि मुलांच्या शिक्षणाचीही काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्नू पी.एम. आणि पोलीस अधीक्षक (ग्रामीण) प्रकाश जाधव यांनीही महसूल दिनानिमित्त अधिकारी-कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देत महसूल प्रशासन आणि अन्य विभागांमध्ये अधिक प्रभावी समन्वयाची गरज व्यक्त केली.

**सेवानिवृत्त अधिकारी, गुणवंत पाल्यांचा गौरव**

महसूल विभागातून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले अपर जिल्हाधिकारी अनंत गव्हाणे, डॉ. भारत कदम आणि राजेश काटकर यांचा प्रदीर्घ शासकीय सेवेबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या गुणवंत पाल्यांचा त्यांच्या शैक्षणिक यशाबद्दल गौरव करण्यात आला.

**उत्कृष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार**

महसूल दिनानिमित्त उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. अपर जिल्हाधिकारी संवर्गातील संभाजी अडगुणे, उपजिल्हाधिकारी संवर्गातील जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी व उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) एकनाथ बंगाळे, तसेच तहसीलदार संवर्गातील छत्रपती संभाजीनगरचे तहसीलदार शिवानंद बिडवे आणि सोयगावच्या तहसीलदार मनीषा मेने यांचा सत्कार करण्यात आला.

नायब तहसीलदार संभाजी देशमुख, अनिता खुणे, लघुलेखक दत्तात्रय आटुळे, सहायक महसूल अधिकारी संवर्गातील दिनेश हापत, राजू देवळे, आकाश आरमाळ, गोपीनाथ जैवळ, सतीश पेंडसे आणि गजानन चिपडे यांच्यासह मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, महसूल सहायक, वाहनचालक, शिपाई, महसूल सेवक व पोलीस पाटील आदी विविध संवर्गातील उत्कृष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांचाही गौरव करण्यात आला.

## माजी सैनिकांच्या पाल्यांच्या उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदतीसाठी अर्ज 30 सप्टेंबरपर्यंत सादर करण्याचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय सैन्यात देशसेवा बजावणारे माजी सैनिक, त्यांच्या पत्नी, विधवा तसेच त्यांच्या होतकरू पाल्यांसाठी एक अत्यंत दिलासादायक आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या वतीने जिल्ह्यातील माजी सैनिकांच्या पाल्यांना विविध उच्च व व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेण्यासाठी एकरकमी आर्थिक मदत देण्याची विशेष योजना राबविण्यात येत आहे. या कल्याणकारी योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक सर्व कागदपत्रांसह आपले परिपूर्ण प्रस्ताव आगामी ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे सादर करावेत, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

या विशेष शैक्षणिक आर्थिक मदतीसाठी जिल्हा प्रशासनाने अत्यंत स्पष्ट आणि सर्वसमावेशक निकष निश्चित केले आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेत किमान ६० टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळवून यश संपादन केले आहे, अशा माजी सैनिकांच्या पाल्यांना या आर्थिक मदतीचा लाभ दिला जाणार आहे. याशिवाय, ज्या विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावी किंवा बारावीच्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण प्राप्त करून कोणत्याही मान्यताप्राप्त अभियांत्रिकी (इंजिनिअरिंग) किंवा तत्सम पदविका (डप्लोमा) अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आहे, ते विद्यार्थी देखील या मदतीसाठी पूर्णपणे पात्र ठरणार आहेत.

तसेच, ज्या विद्यार्थ्यांनी इयत्ता बारावीच्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण मिळवून वैद्यकीय (मेडिकल), अभियांत्रिकी, आयुर्वेदिक तसेच इतर उच्च पदवी अभ्यासक्रमांचे शिक्षण सुरू ठेवले आहे.

## कन्नड येथे जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय क्र. 2 कार्यान्वित; भूमी अभिलेखातील दुरुस्ती व अपील प्रकरणांचा निपटारा आता जलद होणार

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** कन्नड शहर आणि परिसरातील नागरिकांना भूमी अभिलेखाशी संबंधित विविध महसुली व प्रशासकीय सेवा अधिक जलद, सुलभ तसेच स्थानिक पातळीवर उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने उपसंचालक भूमी अभिलेख, छत्रपती संभाजीनगर प्रदेश यांच्या अधिपत्याखाली 'जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, छत्रपती संभाजीनगर क्र. २, मुख्यालय कन्नड' हे नवीन कार्यालय पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात आले आहे. या नवीन कार्यालयाच्या माध्यमातून १५ जून २०२६ पासून नागरिकांना सर्व संबंधित सेवा अधिकृतपणे पुरवण्यात येत आहेत.

हे नवीन कार्यालय संतराम कॉम्प्लेक्स, शरद पवार कॉलनीसमोर, चाळीसगाव रोड, कन्नड या ठिकाणी सुरू करण्यात आले आहे. भूमी अभिलेखाशी संबंधित विविध कामांसाठी नागरिकांना होणारा त्रास व वेळेचा अपव्यय टाळणे, तसेच प्रलंबित प्रकरणांचा स्थानिक पातळीवरच वेगाने निपटारा करणे हा हे कार्यालय सुरू करण्यामागचा मुख्य उद्देश आहे.

या कार्यालयामार्फत नगर भूमापन अभिलेख आणि ७/१२ उताऱ्यांशी संबंधित अनेक महत्त्वाची दुरुस्तीची कामे हाताळली जाणार आहेत. नगर भूमापन अभिलेखामध्ये अनवधानाने झालेल्या त्रुटींची दुरुस्ती जसे की, क्षेत्र दुरुस्ती, नाव दुरुस्ती आणि सत्ता प्रकार दुरुस्ती यांसारखी कामे येथे केली जातील. याशिवाय ७/१२ अभिलेखातील क्षेत्र, नाव, गट क्रमांक आदी बाबींशी संबंधित दुरुस्तीची प्रकरणे आणि विविध अपील प्रकरणे नियमानुसार याच कार्यालयामार्फत निकाली काढण्यात येतील.

तसेच एकत्रीकरण कायद्यांतर्गत अभिलेख तयार करताना झालेल्या चुका आणि संबंधित कायद्यातील कलम ३१ (अ) व कलम ३२ अंतर्गत येणारी दुरुस्तीची कामेसुद्धा या कार्यालयामार्फत केली जाणार आहेत. भूमी अभिलेखविषयक सर्व सेवा नागरिकांना अधिक प्रभावी आणि पारदर्शक पद्धतीने वेळेत उपलब्ध करून देण्यावर प्रशासनाचा भर असणार आहे. कन्नड व परिसरातील नागरिकांनी आपल्या भूमी अभिलेखाशी संबंधित प्रकरणांसाठी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय क्र. २, मुख्यालय कन्नड येथे संपर्क साधून सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## उरण महाविद्यालयात जपानी भाषा प्रशिक्षणाची सुरुवात

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी




**उरण /रायगड :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी जपानी भाषा शिकवली जाणार आहे. जपान मधील करिअरच्या संधी लक्षात घेऊन तसेच भारतातील विविध जपानी कंपन्यांमध्ये कार्य करण्यासाठी जापनीज भाषा येणे अत्यंत महत्त्वाचे आहे.उरण सारख्या ठिकाणी अश्या प्रकारची भाषा शिकण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या वर्गाचा नुकताच उदघाटन कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले . या वेळी कपिल पाटील शैक्षणिक संस्थेचे चेअरमन तथा कोकण ज्ञानपीठचे अध्यक्ष कपिल पाटील (माजी मंत्री, भारत सरकार) कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. त्यांनी जपानची टेक्नॉलॉजी शिकून भारताच्या प्रगतीसाठी तिचा वापर करावा २०४७ चा विकसित भारत घडवण्यात तरुणांनी योगदान द्यावे असे प्रतिपादन केले या प्रसंगी जपानच्या महा वाणिज्य दुतावास मधील संशोधक सल्लागार हिदेयुकी मिहारा उपस्थित होते त्यानीं जपान मधील करिअरच्या संधी याविषयी माहिती सांगून विद्यार्थ्यांनी एकाग्रतेने जपानी शिकावी असे प्रतिपादन केले व जपानी भाषेतून आपले करिअर घडवावे यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वाल्मीक गर्जे यांनी केले व अभ्यासक्रम आयोजित करण्याचा उद्देश सांगितला. याप्रसंगी मिलिंद संत यांनी थोडक्यात आपले मनोगत व्यक्त केले ते प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना जपानी भाषा शिकवणार आहेत. कार्यक्रमात कोकण ज्ञानपीठचे सीईओ प्रदीपचंद्र शृंगारपुरे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य रमेश ठाकूर, विशाल पाटेकर ( अध्यक्ष माजी विद्यार्थी संघ), प्राचार्य मोहन काळे ( राहुल धारकर फार्मसी महाविद्यालय, कर्जत) प्राचार्य विलास पिल्लेवान (कोकण ज्ञानपीठ अभियांत्रिकी महाविद्यालय, कर्जत), कु, पुजा मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हन्नत शेख यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. पराग कारुळकर यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी टी एन घ्यार व प्रा. रियाज पठाण यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व जापनीज भाषा प्रशिक्षण शिबिरात प्रवेश घेतलेले विद्यार्थी उपस्थित होते.

## राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानातील भरती प्रक्रिया रद्द; सर्व नियुक्त्या कंत्राटी पद्धतीने!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागांतर्गत राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान आणि इतर योजनांमधील सुरू असलेली भरती प्रक्रिया पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या नव्या धोरणानुसार यापुढे आरोग्य विभागातील मनुष्यबळाची नियुक्ती थेट भरतीद्वारे न करता कंत्राट पद्धतीने केली जाणार आहे.

आयुक्त (शहरी आरोग्य), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांच्या ७ ऑगस्ट २०२६ रोजीच्या पत्रानुसार हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान १५ वा वित्त आयोग तसेच हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना आदी योजनांतर्गत सुरू असलेल्या सर्व भरती प्रक्रिया यामुळे तात्काळ रद्द करण्यात आल्या आहेत.

शासनाच्या सुधारित धोरणानुसार, नागरी आरोग्य संस्थांमधील आवश्यक मनुष्यबळ आता थेट भरतीऐवजी ठोक मानधन तत्त्वावर बाह्य यंत्रणेमार्फत कंत्राटाद्वारे उपलब्ध करून घेतले जाणार आहे. त्यामुळे यापूर्वी राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेल्या सर्व भरती जाहिराती रद्द समजण्यात याव्यात, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच, रद्द करण्यात आलेल्या या भरती प्रक्रियेतून यापुढे कोणतीही नवीन नियुक्ती केली जाणार नाही, असेही मनपा आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

# संत रविदास महाराजांच्या ६५०व्या जयंतीनिमित्त वंदन कलश वितरण

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी






**छत्रपती संभाजीनगर :** जगद्गुरू संत शिरोमणी श्री गुरु रविदास महाराज यांच्या ६५०व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने राज्यभर राबविण्यात येत असलेल्या 'समर्पित समरसता संकल्प अभियाना'अंतर्गत वंदन कलश वितरणाचा कार्यक्रम शुक्रवारी मुकुंदवाडी येथील कसलीवाल कॉम्प्लेक्समध्ये उत्साहात पार पडला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि राष्ट्रीय सरचिटणीस दुष्यंतकुमार गौतम यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात विविध धर्म, पंथ आणि संप्रदायांतील संत-महंत एकाच व्यासपीठावर एकत्र आले.

संत गुरु रविदास महाराजांनी आपल्या जीवनातून समता, सामाजिक न्याय, बंधुता, मानवता आणि सामाजिक समरसतेचा संदेश दिला. त्यांच्या ६५०व्या जयंती वर्षानिमित्त त्यांच्या विचारांचा प्रसार समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांत वंदन कलशांचे वितरण करून सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यात येत आहे.

छत्रपती संभाजीनगरमधील कार्यक्रमात महानुभाव, वारकरी, लिंगायत, वीरशैव, उदासीन आखाडा, शीख यांसह विविध संप्रदायांतील संत-महंतांनी उपस्थिती लावली. संत-महंतांच्या हस्ते वंदन कलशांचे पूजन करण्यात आले. जात, पंथ, धर्म, भाषा आणि प्रदेशाच्या भेदांपलीकडे जाऊन समरस समाजाची निर्मिती करणे, हीच संत रविदास महाराजांना खरी आदरांजली असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

कार्यक्रमास माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, अभियानाचे सहसंयोजक आमदार नारायण कुचे, संयोजक आमदार माधवीताई नाईक, आमदार बबनराव लोणीकर, माजी आमदार संजय केणेकर, आमदार अनुराधाताई चव्हाण, आमदार संतोष पाटील दानवे, महापौर समीर राजूरकर, भाजपा जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, पूर्व जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, पश्चिम ग्रामीण जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समरस, सक्षम आणि आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीसाठी प्रत्येक नागरिकाने योगदान द्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# संपादकीय

## राजकीय वाद आणि पोलिसांचा बळी

पंजाबमधील आम आदमी पार्टी सरकारने अमृतसरचे पोलीस आयुक्त गुरप्रीत सिंह भुल्लर यांची केलेली तडकाफडकी हकालपट्टी ही प्रशासकीय धोरणांपेक्षा राजकीय दबावातून झालेली कारवाई असल्याचे उघड होत आहे. दिल्लीतील जंतर-मंतरवरील एका आंदोलनाचा संबंध पाकिस्तानच्या आयएसआय (ISI) नेटवर्कशी जोडणाऱ्या व्हिडिओ क्लिपवरून निर्माण झालेल्या वादानंतर हे पाऊल उचलण्यात आले. पोलीस दलाने स्पष्टीकरण देऊनही पोलीस आयुक्तांवर झालेली ही कारवाई राज्याच्या प्रशासकीय स्वायत्ततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करते. अमृतसर पोलिसांनी अधिकृतपणे स्पष्ट केले होते की, सोशल मीडियावर प्रसारित झालेली व्हिडिओ क्लिप संपादित (एडिटेड) असून ती विपर्यस्त स्वरूपात मांडण्यात आली होती. पत्रकार परिषदेत पकडण्यात आलेल्या दहशतवादी मॉड्युलचा पर्दाफाश करताना आरोपींनी केवळ जंतर-मंतर परिसराची रेकी केली होती, असा उल्लेख होता. ते आंदोलनात सहभागी असल्याचा कोणताही दावा पोलिसांनी केला नव्हता. पोलिसांच्या या अधिकृत निवेदनानंतर आणि दिशाभूल करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईचा इशारा दिल्यानंतरही थेट पोलीस आयुक्तांवरच गदा आणणे हा प्रकार संशयास्पद वाटतो. पंजाबसारख्या संवेदनशील आणि सीमावर्ती राज्यात पोलीस दलाचे खच्चीकरण होणे अत्यंत धोक्याचे आहे. आयएसआय आणि गुन्हेगारी मॉड्युलचा पर्दाफाश करणाऱ्या अधिकाऱ्यांनाच राजकीय वादाचा बळी ठरवले गेले, तर कायदा व सुव्यवस्थेचे रक्षण करणाऱ्या यंत्रणेचे नीतिमत्ता ढासळू शकते. अधिकृत कारण न देता थेट महासंचालक कार्यालयात हजर राहण्याचे आदेश देणे ही केवळ बदली नसून एक प्रकारची दंडात्मक कारवाई मानली जात आहे. राजकारण्यांच्या राजकीय सोयीसाठी किंवा सोशल मीडियावरील अफवांच्या दबावाखाली येऊन सनदी अधिकाऱ्यांचा बळी देणे ही प्रशासनासाठी घातक परंपरा आहे. पंजाब सरकारने अशा निर्णयांचे समर्थन करताना सुरक्षेच्या आणि तपासाच्या गांभीर्याचा विचार करणे गरजेचे होते. राजकीय हितसंबंधांपेक्षा राज्याची सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्थेचे स्थान वरचे असले पाहिजे, हा धडा या घटनेतून घेण्याची गरज आहे.

## मराठी भाषा विभागासह अधिनस्त कार्यालयांची सात संकेतस्थळे नव्या स्वरूपात कार्यान्वित नव्या संकेतस्थळांचा लाभ घेण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता. प्रतिनिधी.

**परभणी:** मराठी भाषा विभाग तसेच विभागाच्या अधिनस्त कार्यालयांची एकूण सात संकेतस्थळे महाराष्ट्र शासनाच्या मानक डोमेन संरचनेनुसार नव्या स्वरूपात कार्यान्वित करण्यात आली आहेत. नागरिक, संशोधक, अभ्यासक, विद्यार्थी, साहित्यप्रेमी तसेच शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांनी या नव्या संकेतस्थळांचा वापर करावा, असे आवाहन मराठी भाषा विभागाने केले आहे.

मराठी भाषा विभाग तसेच विभागाच्या अधिनस्त भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ आणि राज्य मराठी विकास संस्था यांच्या एकूण सात संकेतस्थळांच्या हस्तांतरणाची कार्यवाही MahaIT मार्फत सुरू होती. या हस्तांतरण प्रक्रियेदरम्यान संकेतस्थळांसाठी महाराष्ट्र शासनाच्या मानक डोमेन संरचनेनुसार नवीन डोमेन वापरण्याची कार्यवाही करण्यात आली.

या तांत्रिक प्रक्रियेदरम्यान आवश्यक प्रणालीगत बदल करण्यात येत असल्यामुळे संबंधित संकेतस्थळे काही काळ तात्पुरती अनुपलब्ध होती. आता हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाली असून सर्व संकेतस्थळे नव्या स्वरूपात नियमितपणे कार्यान्वित करण्यात आली आहेत.

**नवीन संकेतस्थळांचा तपशील पुढीलप्रमाणे :**

१. मराठी भाषा विभाग – marathi.maharashtra.gov.in

२. भाषा संचालनालय – directorate-marathi.gov.in

३. राज्य मराठी विकास संस्था – rmvs-marathi.maharashtra.gov.in

४. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ – sahitya-marathi.maharashtra.gov.in

५. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ – marathivishwakosh.maharashtra.gov.in

६. विश्वकोश प्रथमावृत्ती (खंड १ ते २०) – vishwakosh-marathi.maharashtra.gov.in

७. मराठी परिभाषा कोश – shabdakosh-marathi.maharashtra.gov.in

मराठी भाषा, साहित्य, संस्कृती, विश्वकोश, परिभाषा तसेच विविध संदर्भसाहित्याशी संबंधित माहिती नागरिकांना अधिक सुलभपणे उपलब्ध व्हावी, यासाठी ही संकेतस्थळे उपयुक्त ठरणार आहेत. सर्व नागरिक, संशोधक, अभ्यासक, विद्यार्थी, साहित्यप्रेमी, शासकीय अधिकारी-कर्मचारी तसेच संबंधितांनी नव्या संकेतस्थळांची नोंद घेऊन त्यांचा उपयोग करावा, असे मराठी भाषा विभागाने कळविले आहे.

**CHANGE OF NAME** हिंदू प्रकाशवार्ता

I, [ OLD NAME , SHAIKH KALEEM BASHIR ](शेख कलीम बशीर), residing at Near jama chauk,at. Post Shivna.Tq.Sillod.Dist Chh. Sambhajinagar [431132], have changed my name to [New Name,SHAIKH KALEEM SHAIKH BASHIR],(शेख कलीम शेख बशीर) and shall hereafter be known as [Name,SHAIKH KALEEM SHAIKH BASHIR](शेख कलीम शेख बशीर) for all purposes.

# वनामकृवित बीज संवर्धक संवाद व कार्यशाळेचा शुभारंभ

## देशी वाणांचे जनुक संवर्धक शेतकरी हे समाजाचे, देशाचे खरे मित्र : कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.





**परभणी** :-मराठवाड्यात देशी बीज संवर्धनासाठी व्यापक जनजागृतीची गरज - माजी कृषी आयुक्त माननीय डॉ. उमाकांत दांगट (से.नि.भा.प्र.से.) कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणी माजी कृषी आयुक्त माननीय डॉ. उमाकांत दांगट (से.नि.भा.प्र.से.)

महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्प (विशेष कक्ष) च्या संचालक पूनम पाटे (भा.व.से.)

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्प (विशेष कक्ष) आणि बायफ डेव्हलपमेंट रिसर्च फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय "मराठवाडा बीज संवर्धक संवाद व कार्यशाळेचा" उद्घाटन समारंभ दिनांक ६ ऑगस्ट २०२६ रोजी उत्साहात पार पडले. या कार्यशाळेत मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील ७५ हून अधिक बीज संवर्धक शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला. या कार्यशाळेचे आयोजन ६ व ७ ऑगस्ट रोजी विद्यापीठाच्या सिम्पोजियम सभागृहात करण्यात आले. तसेच यानिमित्त मराठवाड्यातील बीज संवर्धक शेतकऱ्यांच्या विविध जनुकाचे प्रदर्शनाचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कार्यशाळेत विविध दहा तांत्रिक सत्राच्या माध्यमातून शेतकरी, विद्यापीठ शास्त्रज्ञ आणि मंडळाचे तसेच बायफ संस्थेच्या अधिकाऱ्यांमध्ये विचारांची देवाणघेवाण होणार आहे.

उद्घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि म्हणाले की, देशी वाणांचे जनुक संवर्धन करणारे शेतकरी हे महाराष्ट्राचे, देशाचे आणि समाजाचे खरे मित्र आहेत. वाढत्या मानवी गरजा आणि संसाधनांच्या अतिरेकी वापरामुळे गेल्या शतकात जैवविविधतेचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास झाला आहे. जैवविविधतेचे संशोधन, संकलन, जतन, संवर्धन आणि प्रसार करणे ही काळाची गरज असून प्रत्येकाने या कार्यात योगदान द्यावे, असे त्यांनी सांगितले. विद्यापीठ परिसरही जैवविविधतेने समृद्ध असून त्याचे दस्तऐवजीकरण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाच्या सहकार्याने विशेष उपक्रम हाती घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. वनस्पती, पशुधन आणि मत्स्य संपदेतील जनुकीय विविधतेचे जतन करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर होत असलेल्या कार्याचा उल्लेख करत त्यांनी जनुक संवर्धन करणाऱ्या शेतकऱ्यांची नोंद घेऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. विद्यापीठाचे लातूर येथील जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या माध्यमातून विद्यापीठ सातत्याने या क्षेत्रात कार्यरत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

माजी कृषि आयुक्त तथा स्मार्ट प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी माननीय डॉ. उमाकांत दांगट (से. नि. भा.प्र. से.) यांनी देशी बीज संवर्धन हा अत्यंत महत्त्वाचा पण दुर्लक्षित विषय असल्याचे सांगितले. निसर्गाने निर्माण केलेली जैवविविधता मानवी हस्तक्षेपामुळे धोक्यात आली असून "जगा आणि जगू द्या" ही संकल्पना स्वीकारून जैवविविधतेचे जतन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. मराठवाड्याचा नैसर्गिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा समृद्ध असून त्याचे संवर्धन करण्याची जबाबदारी सर्वांची असल्याचे त्यांनी सांगितले. पूर्वी शेतकरी स्वतः उत्कृष्ट बियाण्यांची निवड व संवर्धन करत असत, ती परंपरा पुन्हा सुरू करून उत्पादन खर्च कमी करत शाश्वत शेतीकडे वाटचाल करण्याचे आवाहन त्यांनी केले.

संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार यांनी शेतकरी हेच खरे देशी बीज संवर्धक शास्त्रज्ञ असल्याचे सांगितले. हवामान बदलामुळे पर्जन्यमानातील अनिश्चितता वाढत असून अशा परिस्थितीत देशी बियाण्यांचे महत्त्व अधिक वाढले आहे. विद्यापीठाच्या लातूर येथील जैवतंत्रज्ञान महाविद्यालयामार्फत जनुक संवर्धनाचे कार्य सुरू असून विद्यापीठाच्या २५ अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्पांपैकी दहा केंद्रांनी राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळविल्याची माहिती त्यांनी दिली. जैवविविधतेचे संवर्धन हे शाश्वत शेती, पोषण सुरक्षा आणि भावी पिढ्यांच्या हितासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रास्ताविकात महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्प (विशेष कक्ष) च्या संचालक पूनम पाटे (भा.व.से.) यांनी महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाच्या कार्याचा परिचय करून दिला. जनुक संवर्धन करणाऱ्या शेतकऱ्यांची ओळख निर्माण करून त्यांना राष्ट्रीय स्तरावर प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. पद्मश्री राहीबाई पोपरे यांच्या कार्याचा उल्लेख करत देशी बियाणे हीच आपली खरी ओळख आणि भविष्यातील अन्नसुरक्षेची गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे प्रकल्प अधिकारी श्री. रवींद्र वानखडे (से. नि.भा.व.से.) यांनी मंडळाच्या स्थापनेची पार्श्वभूमी आणि विविध उपक्रमांचा आढावा घेत कार्यशाळा बीज संवर्धन चळवळीला नवी दिशा देणारी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

बायफचे उपाध्यक्ष डॉ. रविराज जाधव यांनी हरितक्रांतीमुळे अन्नधान्य उत्पादनात देश स्वयंपूर्ण झाला असला तरी जैवविविधतेच्या संवर्धनाकडे अपेक्षित लक्ष गेले नसल्याची खंत व्यक्त केली. हवामान बदलामुळे निर्माण झालेल्या समस्यांवर मात करण्यासाठी बायफतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी दिली.

बायफचे संशोधक श्री संजय पाटील यांनी देशी बियाणे हे शेतीचा आत्मा आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांकडे असलेल्या पारंपरिक ज्ञानाचे वैज्ञानिक दस्तऐवजीकरण करून त्यावर संशोधन करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. जनुकीय विविधता, जीआय मानांकन प्राप्त पिकांचे संवर्धन आणि देशी वाणांच्या साठवणूक तंत्रज्ञानावर कार्यशाळेत सखोल विचारमंथन होणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात विद्यापीठाचे शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे, सर्व महाविद्यालयाचे अधिष्ठाता, विभाग प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विभागीय वनाधिकारी रूपाली सावंत यांनी केले.

# राष्ट्रध्वजाचा सन्मान, राष्ट्रभक्तीचा अभिमान : 9 ते 17 ऑगस्ट कालावधीत "हर घर तिरंगा" अभियान

## परभणी जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने "हर घर तिरंगा" अभियानात उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे : जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी,** :- भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त दि. ९ ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत 'हर घर तिरंगा' अभियान परभणी जिल्हयात प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. या अभियानात जिल्ह्यातील प्रत्येक नागरिक, विद्यार्थी, युवक, महिला, सामाजिक संस्था, व्यापारी, उद्योग, शासकीय व निमशासकीय कार्यालयांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले.

'हर घर तिरंगा' अभियानाच्या यशस्वितेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आज पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली. त्यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) अनिता भालेराव आदींसह पत्रकार उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. चव्हाण म्हणाले की, 'हर घर तिरंगा' हे प्रत्येक भारतीयाच्या मनात राष्ट्रध्वजाविषयी आदर, राष्ट्रभक्तीची भावना आणि राष्ट्रीय एकात्मतेची जाणीव अधिक दृढ करणारे अभियान आहे. त्यामुळे या अभियानात समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. अभियानाच्या कालावधीत जिल्ह्यात शहर, तालुका व ग्राम स्तरावर तिरंगा बाइक रॅली, सायकल रॅली, पायी रॅली, देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम, रांगोळी, तिरंग्याच्या रंगांची विद्युत रोषणाई, 'सेल्फी विथ तिरंगा' यांसह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमांमध्ये युवक, विद्यार्थी, क्रीडा संघटना, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनांचा सक्रिय सहभाग घ्यावा.

राष्ट्रभक्तीचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी रॅलींचे आयोजन ऐतिहासिक स्थळे, स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मृतीस्थळांपासून तसेच प्रमुख सार्वजनिक ठिकाणांवरून करण्यात येणार आहे. सर्व रॅलींसाठी पोलीस विभागामार्फत सुरक्षा व वाहतूक व्यवस्थेचे योग्य नियोजन करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी जिल्हाधिकारी यांनी दिली.

नागरिकांनी 'सेल्फी विथ तिरंगा' या उपक्रमात सहभागी होत तिरंग्यासोबत छायाचित्र अथवा व्हिडिओ तयार करून अधिकृत https:harghartiranga.com या संकेतस्थळावर अपलोड करावेत. तसेच आपल्या कुटुंबीय, मित्रपरिवार आणि शेजाऱ्यांनाही या अभियानात सहभागी होण्यासाठी प्रेरित करावे, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्ह्यातील शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक इमारती, रुग्णालये, धरणे, पूल आणि महत्त्वाच्या ठिकाणी तिरंग्याच्या रंगांची आकर्षक रोषणाई करण्यात यावी. याशिवाय 'वंदे मातरम्' या गीतावर भव्य रांगोळी तसेच देशभक्तीपर गीतांचे विशेष कार्यक्रम आयोजित करून स्वातंत्र्यदिनाचा उत्सव अधिक दिमाखात साजरा केला जाणार आहे.

दि. १४ ऑगस्ट २०२६ रोजी देशभर 'फाळणी स्मरण दिवस' पाळण्यात येणार आहे. फाळणीच्या वेदनादायी इतिहासाची जाणीव विशेषतः तरुण पिढीला करून देणे तसेच प्रभावित झालेल्या लाखो नागरिकांच्या त्याग आणि जिद्दीला अभिवादन करणे हा या उपक्रमाचा उद्देश राहणार आहे.

तसेच 'हर घर तिरंगा' अभियान यंदा 'वंदे मातरम्' गीताच्या १५० वर्षांच्या स्मरणार्थ समर्पित असून, यानिमित्ताने विविध जनजागृती कार्यक्रमांसह वंदे मातरम गायनाचे आयोजन करण्यात येणार आहे. या अभियानात जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाचा सहभाग वाढविण्यासाठी विविध जनजागृती उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, 'हर घर तिरंगा' हा राष्ट्रीय सन्मानाचा उत्सव असून प्रत्येक नागरिकाने त्यात स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले.

# डीएमआयसी ऑरिक परिसरात स्वतंत्र प्राधिकारण गरजेचे; रुग्णालये, उद्याने, ट्रक टर्मिनन्स, ट्रान्सपोर्ट हब, नागरी सुविधांसाठी स्वतंत्र नियोजनाची मागणी

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

शेंद्रा-बिडकीन डीएमआयसी परिसराचा औद्योगिक विकास झपाट्याने होत असून, आगामी काळात हा परिसर छत्रपती संभाजीनगरच्या आर्थिक विकासाचे प्रमुख केंद्र म्हणून आकार घेणार आहे. जगभरातील नामांकित कंपन्यांचे प्रकल्प या परिसरात येत असून, स्कोडा, टोयोटा, आयशर यांसह विविध उद्योगसमूहांच्या विस्तारामुळे शेंद्रा-बिडकीन परिसराच्या औद्योगिक तसेच नागरी विकासाला मोठी चालना मिळणार आहे. या पार्श्वभूमीवर डीएमआयसी परिसराच्या सर्वंकष आणि नियोजनबद्ध विकासाची मागणी जोर धरू लागली असून, परिसरातील शेतकऱ्यांच्या आशाही पल्लवित झाल्या आहेत.

डीएमआयसी परिसरात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक झाली असून, भविष्यातील औद्योगिक विस्ताराची दिशा ओळखून अनेक उद्योगसमूह येथे प्रकल्प उभारण्यास उत्सुक आहेत. औद्योगिक प्रकल्पांच्या वाढत्या संख्येबरोबरच या परिसरात कुशल आणि अकुशल मनुष्यबळासाठी मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. परिणामी शेंद्रा-बिडकीन परिसराची लोकसंख्या, व्यावसायिक उलाढाल आणि नागरी गरजा मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे.

डीएमआयसीच्या विस्तारासोबत रुग्णालये, शाळा-महाविद्यालये, उद्याने, क्रीडांगणे, सार्वजनिक सुविधा केंद्रे, अग्निशमन केंद्रे, पोलीस ठाणे, ट्रान्सपोर्ट हब, ट्रक टर्मिनस, पार्किंग सुविधा, लॉजिस्टिक सुविधा तसेच इतर आवश्यक नागरी सुविधांसाठी पुरेशी जागा आधीच निश्चित करणे गरजेचे आहे. विकसित आणि अविकसित भागांची स्पष्ट आखणी करून भविष्यातील लोकसंख्या व उद्योगांची गरज लक्षात घेऊन पायाभूत सुविधांचे परिपूर्ण नियोजन करणे आवश्यक आहे.

सध्या मोठ्या प्रमाणावर जमीन व्यवहार होत असताना भविष्यात सार्वजनिक उपयोगाच्या सुविधा उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या जागा उपलब्ध राहतील का, हा प्रश्नही महत्त्वाचा ठरत आहे. त्यामुळे आताच सर्वसमावेशक विकास आराखडा तयार करून त्यामध्ये विविध सुविधांसाठी आवश्यक भूखंड राखीव ठेवण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

**बॉक्स :** शहराचे जीवनमान उंचावणार!

वाळूज औद्योगिक परिसराच्या विकासासाठी ज्या पद्धतीने नियोजनाची चौकट उभी करण्यात आली, त्याच धर्तीवर शेंद्रा-बिडकीन डीएमआयसीसाठी स्वतंत्र नियोजन प्राधिकरण असावे, अशी आग्रही मागणी शेतकऱ्यांसह नागरिक, उद्योजक आणि बांधकाम क्षेत्रातून पुढे येत आहे. या प्राधिकरणामार्फत औद्योगिक, निवासी आणि व्यावसायिक क्षेत्रांची आखणी, रस्ते व वाहतूक व्यवस्था, सार्वजनिक सुविधा, पर्यावरण संवर्धन, हरित क्षेत्र, जलनियोजन आणि भविष्यातील नागरी विस्तार यांचा एकात्मिक विचार करता येईल. डीएमआयसी हा केवळ उद्योगांचा समूह न राहता उद्योग, रोजगार, निवास, आरोग्य, शिक्षण, वाहतूक आणि जीवनमान यांचा समतोल साधणारे आधुनिक औद्योगिक शहर म्हणून विकसित करण्याची ही योग्य वेळ असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

आंतरराष्ट्रीय दर्जाची पायाभरणी

शेंद्रा-बिडकीन डीएमआयसीमध्ये आगामी काळात होणारी गुंतवणूक आणि औद्योगिक विस्तार लक्षात घेता आज केलेले नियोजन पुढील अनेक दशकांच्या विकासाची दिशा निश्चित करणार आहे. त्यामुळे केवळ उद्योग आणण्यापेक्षा उद्योगांसोबत आवश्यक नागरी सुविधा, पर्यावरणपूरक विकास, सक्षम वाहतूक व्यवस्था आणि दर्जेदार जीवनमान उपलब्ध करून देणे महत्त्वाचे ठरणार आहे. दीर्घकालीन विकास आराखडा तयार करण्यात आला, तर शेंद्रा-बिडकीन डीएमआयसीचा विस्तार शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने होऊ शकतो. त्यातून छत्रपती संभाजीनगरच्या औद्योगिक विकासाला नवी उंची मिळण्याबरोबरच मराठवाड्यातील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आधुनिक औद्योगिक शहराची पायाभरणी होऊ शकते, अशी अपेक्षा उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

# उरणमध्ये राज्यस्तरीय क्रीडा महोत्सवाची पर्वणी; द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे 26 वे राज्यस्तरीय वर्षा मॅरेथॉन व फुटबॉल स्पर्धेंचे भव्य आयोजन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** उरण तालुक्यातील कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात गेली पंचवीस वर्षे सातत्याने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे यंदा भारतीय स्वातंत्र्याच्या ८० व्या वर्धापन दिनानिमित्त २६ वे राज्यस्तरीय वर्षा मॅरेथॉन व फुटबॉल स्पर्धा – २०२६ चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. १४ ते १६ ऑगस्ट २०२६ या कालावधीत होणाऱ्या या क्रीडा महोत्सवामुळे उरण तालुक्यात पुन्हा एकदा क्रीडामय वातावरण निर्माण होणार आहे.

असोसिएशनचे अध्यक्ष महादेव घरत यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत राज्यभरातील शालेय तसेच खुल्या गटातील खेळाडू सहभागी होणार आहेत. विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी, डॉक्टर, अभियंते, उद्योजक आणि क्रीडाप्रेमी नागरिक यांच्या उपस्थितीत हा क्रीडा सोहळा पार पडणार आहे.

स्पर्धेअंतर्गत १४ ऑगस्ट ते १६ ऑगस्ट २०२६ या कालावधीत वीर सावरकर मैदान (लाल मैदान), उरण येथे फुटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. तर १६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता बोकडविरा चारफाटा (एस.एम.एस.ई. ग्रेड मैदान, पेट्रोल पंपाजवळ), ता. उरण, जि. रायगड येथून "द्रोणागिरी महाराष्ट्र अभिमान दौड" वर्ष मॅरेथॉन स्पर्धेला प्रारंभ होणार आहे.

स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण सोहळा १६ ऑगस्ट रोजी सकाळी १०.०० वाजता मॅरेथॉन स्थळी आयोजित करण्यात आला असून, विजेत्या खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे.

द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनची स्थापना उरण तालुक्यातील गुणवंत खेळाडू, कलाकार व युवकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्यातील प्रतिभेला प्रोत्साहन देणे आणि राष्ट्रीय स्तरावर उरण तालुक्याचे नाव उज्ज्वल करणे या उद्देशाने करण्यात आली आहे. गेल्या २५ वर्षांपासून संस्था सातत्याने विविध क्रीडा, सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रम राबवत असून, यंदाचे २६ वे वर्षही त्याच परंपरेला साजेसे ठरणार आहे.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अध्यक्ष महादेव घरत, उपाध्यक्ष मनोज पडते, खजिनदार शिवेंद्र म्हात्रे, सचिव दिलीप तांडेल, क्रीडा प्रमुख भरत म्हात्रे, महिला विभाग प्रमुख वैशाली घरत तसेच द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनचे सर्व पदाधिकारी, महिला विभाग, युवक कार्यकर्ते आणि सभासद विशेष परिश्रम घेत आहेत.

द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनने उरण तालुक्यातील तसेच महाराष्ट्रातील सर्व क्रीडाप्रेमी नागरिक, खेळाडू, युवक-युवती आणि शालेय विद्यार्थ्यांना या राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आणि क्रीडापटूंना प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले आहे. हा क्रीडा महोत्सव उरण तालुक्याच्या क्रीडा क्षेत्राला नवी दिशा देणारा आणि युवा पिढीमध्ये क्रीडाभावना, शिस्त व राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ करणारा ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## ॲड. प्रियांका संजय साळवे यांचा जिल्हा परिषद सदस्या निकिताताई राजूबाबा काळे यांच्या हस्ते सत्कार



**अजिंठा प्रतिनिधी :** शिवना येथील प्रियांका संजय साळवे यांनी विधी शिक्षण पूर्ण करून ॲडव्होकेट (Advocate) म्हणून यश संपादन केल्याबद्दल त्यांचा जिल्हा परिषद सदस्या निकिताताई राजूबाबा काळे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी पंचायत समितीचे उपसभापती संदीप राऊत, शिवसेना कार्यकर्ते अजिज अब्बास शेख, आरपीआयचे जिल्हा उपाध्यक्ष सुखदेव जगताप, निलेश जगताप, नाना जगताप तसेच बौद्धवाड्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी निकिताताई राजूबाबा काळे यांनी ॲड. प्रियांका साळवे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. समाजातील गरजू व वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रामाणिकपणे कार्य करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

उपस्थित मान्यवरांनीही ॲड. प्रियांका साळवे यांच्या यशाचे कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## सिल्लोड येथे राष्ट्रवादी काँग्रेसची आढावा बैठक संपन्न

**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड शहरातील राष्ट्रवादी भवन येथे आमदार सतीश चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी पक्ष (अजितदादा पवार गट) या पक्षाची बैठक घेण्यात आली.

पदवीधर मतदार संघाच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व पदवीधर मतदार संघाचे आमदार सतीश चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत ही आढावा बैठक घेण्यात आली.



प्रारंभी राष्ट्रवादी काँग्रेस चे शहराध्यक्ष अमान शेख व राष्ट्रवादी युवक काँग्रेस चे शहराध्यक्ष अक्षय पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केला.

आगामी काळात होणाऱ्या पदवीधर निवडणूक तयारी बाबत उपस्थित कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी सूचना मांडल्या.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आगामी निवडणुकी संदर्भात पदवीधर मतदारांच्या संपर्कात राहून तयारीला लागावे व पक्ष संघटनेच्या मजबुतीसाठी पक्षाकडून येणाऱ्या सूचनांची अंमलबजावणी करावी असे आवाहन आमदार सतीश चव्हाण यांनी यावेळी केले. बैठकीत संघटन बांधणीबाबत चर्चा झाली.

यावेळी सुनील साखळे,अनील राऊत, जिल्हा सचीव, रईस खान, शेख ताहेर, पांडुरंग बडक, प्रवीण काकडे, विलास गोराडे, यांच्यासह पदाधिकारी व पदवीधर मतदार व तालुक्यातील शिक्षक उपस्थित होते. सुत्रसंचालन राजाभाऊ भोसेले यांनी केले तर संजय पालोदकर यांनी आभार मानले.

## छत्रपती संभाजीनगर येथे मंत्री अतुल सावे यांची भाजपचे गुलाबराव पाटील कोलते यांनी घेतली भेट



सावळदबारा प्रतिनिधी.

छत्रपती संभाजीनगर येथे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांची भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी भेट घेतली.

विधान परिषद आमदार सुहास शिरसाठ यांची भेट घेतली भाजपचे अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी, भाजपचे प्रदेश चिटणीस सुरेश बनकर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर मोठे,भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते होते

## कै. छगनआप्पा जाधव यांचे द्वितीय पुण्यस्मरण निमित्य विविध उपक्रमाचे आयोजन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :-**कै. छगनआप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट गोगलगाव तालुका मानवत जिल्हा परभणी च्या वतीने परभणी जिल्ह्याचे प्रतिष्ठित नागरिक स्वर्गवासी छगन आप्पा जाधव यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त सामुदायिक विष्णुसहस्त्रनाम पारायण व रुग्णांना रुग्णांच्या नातेवाईकांना फळ अन्नदान वाटप रक्तदान आधी सामाजिक कार्यक्रमाचे तारखेप्रमाणे दिनांक 9 ऑगस्ट 2026 रोजी परभणी येथे राम कृष्ण हरी अन्नदान छात्रालय चे ह भ प पौढे गुरुजी यांच्या सरकारी हॉस्पिटल येथील सकाळी 8 वाजता रुग्णांना रुग्णांच्या नातेवाईकांना फळे व खिचडी वाटप तसेच ह भ प सुरेश महाराज धावरकर यांच्या विष्णुसहस्त्रनाम पारायण सोहळ्यास फराळ वाटप सकाळी दहा वाजता विठ्ठल रुक्मिणी मंदिर वृंदावन कॉलनी कारेगाव रोड आणि विष्णूभक्त बालाजी महाराज तुंगेनवार यांच्या लक्ष्मी मंदिर स्नेहनगर येथे दुपारी पाच वाजता वाजता ज्ञानेश्वरी पारायण सोहळा मध्ये पारायण करताना फराळ वाटप आधी सामाजिक उपक्रम राबवण्यात येणार तरी सर्वांनी जास्तीत जास्त उपस्थित राहायचे आव्हान कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट गोगलगाव तालुका मानवत जिल्हा परभणी चे मुख्य संचालक गोसेवक नितीन जाधव गोगलगावकरश्री श्री 1008महामंडलेश्वर सचिदानंद सरस्वती , बालकलाकार रुद्राक्ष आवटे रितेश पाटील जाधव परिवार यासाठी विविध सामाजिक राजकीय आध्यात्मिक धार्मिक क्षेत्रातील समाजसेवक उपस्थित राहणार आहेत अशी माहिती गौरक्षक सेना महाराष्ट्र राज्य प्रदेश संघटन मंत्री गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकाद्वारे माहिती दिली

### महाराष्ट्रातील 27+6 ओबीसी जातींच्या केंद्राच्या यादीतील समावेशासाठी दिल्लीत जोरदार पाठपुरावा

# महाराष्ट्र ओबीसी कृती समिती व पवार मिशनचा तीन दिवसीय दौरा यशस्वी

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** महाराष्ट्रातील केंद्राच्या ओबीसी यादीत प्रलंबित असलेल्या २७+६ ओबीसी जातींच्या समावेशासह इतर महत्त्वाच्या ओबीसी प्रश्नांसाठी महाराष्ट्र ओबीसी कृती समिती व पवार मिशनच्या शिष्टमंडळाने २९ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत नवी दिल्ली येथे विविध केंद्रीय मंत्री, खासदार, राष्ट्रीय पिछडा वर्ग आयोगाचे पदाधिकारी आणि वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन निवेदने सादर केली.





दौऱ्याच्या पहिल्या दिवशी (२९ जुलै) केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे, सामाजिक न्याय राज्यमंत्री बी. एल. वर्मा, डॉ. भागवत कराड, लोकसभा ओबीसी वेलफेअर समितीचे अध्यक्ष डॉ. गणेश सिंह, राष्ट्रीय पिछडा वर्ग आयोगाच्या सदस्या किरणताई महल्ले, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, खासदार हेमंत विष्णुजी सावरा, खासदार अमर काळे, खासदार उज्ज्वल निकम, खासदार डॉ. प्रशांत पडोळे, खासदार दर्शनसिंह चौधरी यांची भेट घेऊन महाराष्ट्रातील ओबीसी समाजाच्या प्रलंबित प्रश्नांकडे लक्ष वेधण्यात आले. यावेळी आमदार परिणय फुके व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

दुसऱ्या दिवशी (३० जुलै) सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयात केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. मंत्रालयाचे संयुक्त सचिव (IAS) डॉ. प्रवीण कुमार थिंड, संचालक (OBC Wing) गौरव सिंह राजावत (IAS) व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत महाराष्ट्रातील २७+६ ओबीसी जातींच्या प्रकरणाची सविस्तर चर्चा झाली. या संदर्भात केंद्रीय मंत्रिमंडळासाठी (Cabinet Note) प्रस्ताव तयार करून पुढील प्रक्रिया शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्यात येईल, असे अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले.

यानंतर राष्ट्रीय पिछडा वर्ग आयोगाच्या (NCBC) सदस्या किरणताई महल्ले व वरिष्ठ सल्लागार राजेश यादव यांच्यासोबत प्रलंबित प्रस्तावांचा आढावा घेण्यात आला. राज्य शासनाकडून आवश्यक त्रुटींची पूर्तता झाल्यानंतर पुढील कार्यवाही गतीने केली जाईल, अशी माहिती आयोगाकडून देण्यात आली.

त्यानंतर चंद्रपूरच्या खासदार प्रतिभाताई धानोरकर यांची महाराष्ट्र सदन येथे भेट घेऊन निवेदन सादर करण्यात आले. तसेच केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन महाराष्ट्रातील प्रलंबित ओबीसी प्रश्नांबाबत चर्चा करण्यात आली.

सायंकाळी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी शिष्टमंडळास सहभोजनासाठी आमंत्रित केले. यावेळी ओबीसी समाजाच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली असून प्रलंबित विषय लवकर मार्गी लावण्यासाठी सकारात्मक भूमिका घेण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

तिसऱ्या दिवशी (३१ जुलै) शिष्टमंडळाने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, खासदार अशोक चव्हाण, विनोद तावडे, आमदार चरणसिंह ठाकूर, माजी आमदार सुधाकर कोहळे यांची भेट घेतली. तसेच महाराष्ट्र सदन येथे खासदार उज्ज्वल निकम यांच्यासोबत सविस्तर चर्चा झाली. यावेळी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्र्यांची लवकरच भेट आयोजित करून प्रलंबित विषयावर पुढील पाठपुरावा करण्याचे आश्वासन देण्यात आले.

महाराष्ट्र ओबीसी कृती समितीने स्पष्ट केले की, महाराष्ट्रातील २७+६ ओबीसी जातींचा केंद्राच्या ओबीसी यादीत समावेश होईपर्यंत हा पाठपुरावा सातत्याने सुरू राहणार असून, ओबीसी समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष अधिक तीव्र करण्यात येईल.

शिष्टमंडळ मध्ये, डॉ. नामदेव राऊत, श्रावण फरकाडे, मधुकर चोपडे, मोरेश्वर भादे, कृष्णकुमार डोबले, अर्पण बिसेन, मुकुंद मुसळे व संपूर्ण महाराष्ट्र मधील ४० पदाधिकारी उपस्थित होते

# भारतीय ज्ञान प्रणाली आपला समृद्ध वसा आणि वारसा

## प्राचार्य डॉ. सर्जेराव ठोंबरे यांचे प्रतिपादन



**छत्रपती संभाजीनगर :**

भारतीय ज्ञान प्रणाली हा आपला समृद्ध वसा आणि वारसा आहे, त्याचे प्रतिबिंब डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रमात पडले आहे. 'आस' हा कवितासंग्रहही त्याचेच प्रतिनिधीत्व करतो, असे प्रतिपादन प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य डॉ. सर्जेराव ठोंबरे यांनी शुक्रवारी, ६ रोजी येथे केले.

विवेकानंद महाविद्यालयात मराठी विभाग, साहित्य भारती, संशोधन परिषद व मराठी भाषा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'नवीन शैक्षणिक धोरण व भारतीय ज्ञान प्रणाली' या विषयावर मराठी विषय प्राध्यापकांची चिंतन परिषद आयोजित केली होती. परिषदेत बीजभाषक म्हणून ठोंबरे बोलत होते. परिषदेचे उद्घाटन जेष्ठ तत्वचिंतक डॉ. दिवाकर कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी श्रीमंतराव शिसोदे हे होते, तर प्राचार्य डॉ. दादाराव शेंगुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. ठोंबरे म्हणाले, भारतीय परंपरेचा अभिमान आहे असे आपण फक्त म्हणतो. पण, या परंपरेची मुळातून ओळख करून देणे गरजेचे आहे. विशिष्ट भूमिका डोळ्यासमोर ठेऊन सुजाण नागरिक घडविणारा अभ्यासक्रम मराठी अभ्यास मंडळाने तयार केल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. आपल्या संस्कृतीने निष्काम कर्मयोगाची शिकवण दिलीय, ती शिकवण पुढे संक्रमित झाली पाहिजे. मानवी निकोप व्यवहार चराचराशी व्हायला हवा. अपरिग्रह, विश्वस्त या भूमिकेतून प्रत्येकजण वागला तरच रामराज्य प्रत्यक्षात उतरेल.

डॉ. कुलकर्णी यांनी भारतीय संस्कृतीचे वेगळेपण आणि ऐश्वर्य उलगडून दाखविताना म्हणाले, विद्यार्थ्यांना प्राचीन परंपरेची ओळख करून देणे ही तुमची माझी सर्वांचीच जबाबदारी आहे. मूल्यशिक्षणातूनच राष्ट्रनिर्माणाचा पाया घालता येऊ शकतो.

यावेळी प्रसिद्ध कवयित्री विजयालक्ष्मी सणस यांच्या 'आस' काव्यसंग्रहाचे प्रकाशन मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे व विवेकानंद शिक्षण संस्थेचे सचिव श्रीमंतराव शिसोदे यांच्या हस्ते करण्यात आले. 'आस' कवितासंग्रहाबद्दल कवयित्री विजयालक्ष्मी सणस यांनी लेखनामागील भूमिका स्पष्ट केली. या काव्यसंग्रहावर प्राचार्य डॉ. गणेश शिंदे यांनी भाष्य केले. डॉ. मोहन सौंदर्ये यांनी मराठीच्या नवीन अभ्यासक्रमाची ओळख करून दिली.

डॉ. सर्जेराव जिगे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा मराठी विषयाचा अभ्यासक्रम हा विद्यार्थी व समाज केंद्रस्थानी ठेवून तयार केला आहे. भारतीय ज्ञानप्रणाली सोबतच मराठी विषयातील व्यवसाय व रोजगाराच्या संधी यासंबंधी विचार त्यात केलेला आहे.

प्रास्तविक मराठी विभाग प्रमुख डॉ. दत्तात्रय डुंबरे यांनी, तर पाहुण्यांचा परिचय दीपाली कुलकर्णी यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. एकनाथ शिंदे यांनी, तर डॉ. दिलीप बिरुटे यांनी आभार मानले.


## छत्रपती संभाजीनगर येथे 17 ऑगस्ट रोजी जिल्हास्तरीय 'महिला लोकशाही दिन'

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** समस्याग्रस्त व पीडित महिलांना आपल्या अडीअडचणी थेट शासकीय यंत्रणेसमोर मांडण्यासाठी एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आणि महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या निर्देशानुसार, सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हास्तरीय 'महिला लोकशाही दिना'चे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासन आणि महिला व बाल विकास विभागामार्फत करण्यात आले आहे.

जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित केला जातो. त्या अनुषंगाने ऑगस्ट महिन्यासाठी सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे या उपक्रमाची सुनावणी पार पडणार आहे. महिलांच्या हक्कांचे संरक्षण करणे, त्यांच्या तक्रारींची कायदेशीर व विहित कालमर्यादित सोडवणूक करणे तसेच समस्याग्रस्त महिलांना योग्य न्याय व आवश्यक मार्गदर्शन मिळवून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

## जिंतूर तालुक्यात गौवंशाची अवैध वाहतूक; ट्रक व सात गौवंश जप्त



**जिंतूर प्रतिनिधी :**एका ट्रकमध्ये सात गौवंश दाटीवाटीने बांधून त्यांना अमानुषपणे क्रूरतेने वागवत वाहतूक करीत असल्याची गुप्त माहिती पोलीस निरीक्षक नामदेव रेड्डी यांना मिळाली. त्यावरून त्यांनी सापळा रचत भोगाव रस्त्यावर सदर ट्रक अडवून सात गौवंशाची सुटका करून त्यांना गौशाळेत पाठवून आयशर चालकाविरुद्ध जिंतूर पोलिसांत गुन्हा दाखल केला. ही कारवाई सोमवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास करण्यात आली. यात जनावरे व ट्रक असा एकूण ७ लाख ८३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आयशर ट्रक क्रमांक एमएच ४७ वाय २४५५ यामध्ये सात गौवंशीय प्राणी दाटीवाटीने बांधून क्रूरपणे वाहतूक करत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक नामदेव रेड्डी यांना मिळाली. यावरून त्यांनी बिट जमादार नसीब पठाण, कांबळे, एकनाथ सावंत यांना पाठविले असता त्यांना सदरील ट्रकमध्ये सात गौवंशाची अमानुषपणे वाहतूक होत असल्याचे दिसून आले. त्यांनी याबाबत ट्रक चालक रमेश सुरेश गायकवाड यास सदरील गोवंशीय प्राण्यांच्या वाहतूक करण्याबद्दल परवाना विचारला असता त्याकडे कोणतेही वैध दाखले आढळून आले नाहीत. तेव्हा पोलीस कर्मचारी बाळकृष्ण कांबळे यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरूध्द प्राण्यांना क्रुरतेने वागविणे प्रतिबंध गुन्हा दाखल केला आहे. सात गौवंश अंदाजे किंमत २ लाख ८३ हजार रुपये व पाच लाख रुपये किंमतीचा ट्रक असा एकूण ७ लाख ८३ हजारांचा मद्देमाल जप्त केला आहे.

# संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात 'वेलकम फंक्शन' उत्साहात संपन्न

## प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे उत्स्फूर्त स्वागत; शैक्षणिक,सांस्कृतिक व व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रोत्साहन

हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी



**सोयगाव, दि.६ ऑगस्ट :** अजिंठा शिक्षण संस्थेचे संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील सांस्कृतिक विभागाच्या वतीने बी.ए.बी.कॉम.व बी.एस्सी. प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आयोजित "वेलकम फंक्शन" मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या माध्यमातून नवागत विद्यार्थ्यांचे महाविद्यालयीन कुटुंबात हार्दिक स्वागत करण्यात आले.

व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. शिवाजी अंभोरे,आयक्यूएसी विभागाचे समन्वयक डॉ. प्रमोद पवार,सांस्कृतिक समिती सदस्य डॉ.शंतनू चव्हाण , प्रा. ज्योती स्वामी हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.रावसाहेब बारोटे यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणाचे महत्त्व,राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020),कौशल्य विकास,स्पर्धा परीक्षा, व्यक्तिमत्त्व विकास आणि रोजगाराभिमुख शिक्षण याबाबत सखोल मार्गदर्शन केले.त्यांनी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन स्वतःचा सर्वांगीण विकास साधावा,असे आवाहन केले.

मान्यवरांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास,शिस्त,वेळेचे नियोजन,सामाजिक जाणीव आणि संशोधनाची आवड जोपासण्याचा संदेश दिला. महाविद्यालयातील विविध शैक्षणिक,क्रीडा,सांस्कृतिक आणि संशोधनविषयक उपक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरित केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांनी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयात स्वागत करत महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण परंपरेचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी ज्ञानासोबतच नैतिक मूल्ये,सामाजिक बांधिलकी आणि नेतृत्वगुण विकसित करून आदर्श नागरिक बनावे,असे त्यांनी प्रतिपादन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.ज्योती स्वामी यांनी तर सूत्रसंचालन डॉ.शंतनू चव्हाण यांनी केले.

# अजिंठा पोलीस स्टेशन हद्दितील शिवणा गावातील दोन मनोरुग्ण महिलांना माणुसकीची मदत

**अजिंठा प्रतिनिधी :** *एकिस येरवडा पुणे मनोरुग्णालयात उपचारासाठी दाखल.तर दुसरिस माणुसकी वृद्ध सेवालय संभाजीनगर येथे दाखल करण्यात आले* *अजिंठा पोलीसांच्या व माणुसकी टिम च्या मदतीने दोन मनोरुग्णांन महिलांना मदत.*

मनोरुग्ण महिला नामे सुनिता कडुबा इंगळे वय ४० वर्ष दुसरी महिला वंदना सीताराम जगताप वय ३५ रा. शिवणा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर या महिला गेल्या अनेक वर्षांपासून मानसिक आजाराने त्रस्त आहे. आई वडील वृद्ध असल्याने त्यांचा कडे लक्ष ठेवणे कठीण झाले आहे. आजार जास्त प्रमाणात वाढल्याने सदर महिला ही हिंसक वागत असुन घरातील व्यक्तींना मारहाण करणे लोकांना शिवीगाळ करणे, सर्व सामान्यांना दगड फेकुन मारणे, मोठमोठ्याने ओरडणे,अशा पदधतीचे वर्तणुक करत आहे. त्यांचा आजार खुप मोठ्या स्वरुपात वाढलेला आहे. त्या अनुषंगाने सदर परिसरातील नागरीकांचे जिवितास मोठा धोका निर्माण झालेला असुन तिचा भाऊ व ग्रामपंचायत शिवणा यांची तक्रार प्राप्त असुन त्यात नमुद केले आहे की, आम्ही स्टाफ मार्फत तिस वारंवार जाऊन समक्ष समज दिलेली आहे. परंतु तिचे वागणुकीत काहीही फरक पडत नाही. म्हणून तिचेवर योग्य उपचार होणे गरजेचे आहे. अशी विनंती तिचे भाऊ राजेंद्र सिताराम जगताप रा.बाबा मोरे नगर गणेष कॉलनी कल्यान यांनी पो स्टे अजिंठा ता. सिल्लोड यांनी समक्ष पो स्टे अजिंठा येथे येऊन केलेली आहे.त्यामुळे आम्ही सदर मनोरुगणाची माहीती मनोरुग्णांसाठि काम करणारे सुमित पंडीत, सु-लक्ष्मी बहुउद्देशीय सेवा भावी संस्थेचे अध्यक्ष (नोंदणी क्र. एफ०२२०९४ ए.आर.एम.) अशी असुन सदरची माहीती त्यांना दिली असता त्यांनी सदर मनोरुग्ण महिलांची खात्री केली व शासकीय वैदयकिय रुग्णालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रथमोपचार केल्यानंतर डॉक्टरांनी दिर्घ उपचारासाठी प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा, पुणे येथे पाठविण्याचे आदेशीत केले आहे.त्याकरीता त्यास पुढिल उपचारासाठी प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा पुणे येथे नेण्याचा सल्या डॉक्टरांनी दिल्यानंतर कायदेशीर कागदोपत्री पुर्तता करुन आज त्यास येरवडा पुणे येथे उपचारासाठी नेण्यात आले परंतु पुणे येथील डॉक्टरांनी सांगितले की एकीचा आजार जास्त प्रमाणात नाही तीला आपल्या माणुसकी सेवालयात ठेवून त्यावर उपचार घेता येईल आम्ही औषधोपचार चालू करतो जर आजार जास्तच वाढला तर १५ दिवसांनी आपले मनोरुग्णालयात घेऊन यावे असा सल्ला दिल्याने महिला नामे सुनीता कडुबा इंगळे वय ४० वर्षे हिस माणुसकी वृद्ध सेवालय येथे कागदोपत्री पुर्तता करून तात्पुरत्या नीवाऱ्यासाठि दाखल करण्यात आले.माणुसकी टिम च्या सभासदांनी मदतकार्य करुन उपचारासाठी दाखल केले.यात उपवीभागीय पोलीस अधीकारी सिल्लोड विश्वजित काईगडे यांच्या मार्गदर्शनाखाली शामसुंदर कौठाळे साहेब पोलिस निरीक्षक सिल्लोड शहर,सुधिर मोटे साहेब व पवन इंगळे साहेब सहाय्यक पोलिस निरीक्षक अजिंठा, पोलिस उपनिरीक्षक बाबासाहेब भवर साहेब,भागवत शेळके साहेब,संदिप कोथलकर, पो.हे. कॉ,शिवणा बीट व माणुसकी समुहाचे समाजसेवक सुमित पंडित,के.के.जगताप, ज्ञानेश्वर जगताप,पुजा पंडित आदिंनी मदतकार्य केले,





### माणुसकी समुहाचे कार्य मनोरुग्णानसाठि लाख मोलाचे

मनोरुग्णांच्या जवळ देखील कोणी जायला तयार होत.हे आम्ही स्वतःअनुभवले नाही ते खूप सेन्सिटिव्ह असतात कोणत्याही क्षणी काहीही करू शकतात परंतु समाजसेवक सुमित पंडित करत असलेल्या रंजल्या गांजल्यांच्या सेवा ही खरंच वाखाडणे योग्य आहे. पोलीसांना बेवारस अवस्थेत सापडलेल्याना हक्काचा निवारा मिळवून देतात आज प्रत्यक्ष मी अजिंठा पोलीस स्टेशन चा प्रभारी अधिकारी चार्ज असल्याने माझ्या डोळ्यांनी त्यांना या मनोरुग्ण महिलांच्या सुरक्षेचा दृष्टीने मदत प्रसंगी समाजसेवक सुमित पंडित यांनी मोठे हिमतीने त्या कायदेशीर प्रक्रीया करुन उपचारासाठी पुणे येथे दाखल केले आहे.पोलीसांना सुमित पंडित हे रात्री बेरात्री फोन केला की निःस्वार्थ भावनेने मदतीसाठी तयार असतात त्यांची पोलीसांना वेळोवळी मदत होत आहे. त्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार समाजात अशी खूप कमी लोक आहेत की ते दुसऱ्यासाठी जगतात..

\- सुधिर मोटे सहाय्यक पोलिस निरीक्षक

## मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिरांचा जिल्ह्यात यशस्वी उपक्रम; 3,126 नागरिकांना आरोग्यसेवेचा लाभ



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार १ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिर अभियानाला छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील ५३ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरांचा तब्बल ३,१२६ नागरिकांनी लाभ घेतला.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर आणि अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. छाया आवरगावकर यांच्या नियोजनातून ही शिबिरे प्रभावीपणे राबविण्यात आली. शिबिरांमध्ये नागरिकांची सर्वसमावेशक आरोग्य तपासणी, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला, प्रयोगशाळा तपासण्या, असंसर्गजन्य आजारांचे निदान, माता-बाल आरोग्य सेवा, आवश्यक उपचारांसाठी मार्गदर्शन तसेच आयुष्मान भारत व मुख्यमंत्री जनआरोग्य योजनांची माहिती आणि लाभार्थी नोंदणी करण्यात आली. विविध आरोग्यविषयक जनजागृती उपक्रमही राबविण्यात आले.

## मराठवाडा मंत्रिमंडळ बैठकीतील घोषणा तीन वर्षांनंतरही अपूर्ण; अंबादास दानवेंचा आरोप

### विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्यासोबत निर्णयांच्या सद्यस्थितीवर चर्चा

**हिंदू प्रकाशवार्ता :** प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त १६ सप्टेंबर २०२३ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मराठवाड्याचा अनुशेष भरून काढण्यासाठी विविध विकासकामांची घोषणा करण्यात आली होती. या घोषणांना जवळपास तीन वर्षे पूर्ण होत असतानाही अनेक निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी संथ गतीने सुरू असल्याचा आरोप शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते, आमदार अंबादास दानवे यांनी केला.

मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयांच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी दानवे यांनी शुक्रवारी (७ ऑगस्ट) विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांची भेट घेऊन विविध विकासकामांबाबत चर्चा केली. शासनाकडून मोठ्या प्रमाणात जाहिराती केल्या जात असल्या, तरी प्रत्यक्ष विकासकामांकडे दुर्लक्ष होत असल्याची टीकाही त्यांनी केली. या विषयासंदर्भात मुख्यमंत्र्यांची भेट घेऊनही माहिती दिल्याचे त्यांनी सांगितले. राज्य सरकारची अवस्था 'लबाडाच्या घरचं आमंत्रण' अशी झाली असून घोषणा मोठ्या आणि प्रत्यक्ष कृती अत्यल्प असल्याचे दानवे म्हणाले.



**सिंचन प्रकल्पांसाठी निधी अपुरा**

मंत्रिमंडळ बैठकीत मराठवाड्यातील १३ सिंचन प्रकल्पांचा समावेश करण्यात आला होता. त्यापैकी उर्ध्व पैनगंगा प्रकल्पासाठी भूसंपादनाचा निधी उपलब्ध झाला असून काम प्रगतीपथावर आहे. सहा प्रकल्पांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. मात्र, मारेगाव येथील प्रकल्पाला अद्याप कार्यारंभ आदेश मिळालेला नसल्याचे दानवे यांनी सांगितले.

या प्रकल्पांसाठी सुरुवातीला ८,६७४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. सुधारित प्रशासकीय मान्यतेनंतर हा खर्च १३,५५६ कोटी रुपयांपर्यंत वाढला. मात्र, आतापर्यंत केवळ १,९८६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून मोठ्या प्रमाणात निधी अद्याप प्रलंबित असल्याचा दावा दानवे यांनी केला.

सेलू येथील प्रकल्पासाठी दहा गावांच्या भूसंपादन मोबदल्यासाठी केवळ २५ लाख रुपयांची आवश्यकता असतानाही हा निधी उपलब्ध झालेला नाही. वैजापूर तालुक्यातील शनिदेवगाव, सिल्लोड तालुक्यातील भराडी सिंचन प्रकल्प, नदीजोड प्रकल्प तसेच मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेची कामेही निधीअभावी रखडल्याचे त्यांनी सांगितले.

**कुंपण योजनेचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला नाही**

वन्यप्राण्यांपासून शेतीचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना वैयक्तिक लाभाच्या स्वरूपात कुंपण योजनेचा लाभ मिळत नसल्याची बाबही दानवे यांनी विभागीय आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिली. वन विभागाकडून लाभार्थ्यांच्या याद्या तयार केल्या जात असल्या, तरी प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नसल्याचे त्यांनी नमूद केले. देशी गाईंच्या संवर्धनासाठी मंत्रिमंडळ बैठकीत करण्यात आलेल्या घोषणांवरही अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे दानवे यांनी सांगितले.

**नांदेड कृषी महाविद्यालयाचे काम रखडले**

नांदेड येथे प्रस्तावित कृषी महाविद्यालयाचे सुमारे ४० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम निधीअभावी रखडले आहे. या प्रकल्पासाठी आतापर्यंत २२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असला, तरी काम पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्याचे दानवे यांनी सांगितले.

### समग्र शिक्षा कर्मचाऱ्यांच्या नियमितीकरणाचा मार्ग मोकळा; मंत्री पंकज भोयर यांच्या पुढाकाराला यश

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची समितीच्या शिफारशींना मंजुरी; कर्मचाऱ्यांकडून मंत्री भोयर यांचा कृतज्ञता सत्कार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** समग्र शिक्षा अभियानातील कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या नियमितीकरणाच्या मागणीला अखेर सकारात्मक दिशा मिळाली आहे. मंत्री पंकज भोयर यांच्या नेतृत्वाखालील समितीने केलेल्या शिफारशींना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिल्याने राज्यातील हजारो समग्र शिक्षा कर्मचाऱ्यांच्या नियमितीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयाचे स्वागत करत कर्मचाऱ्यांनी मंत्री पंकज भोयर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन कृतज्ञता सत्कार केला.



**कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण**

नियमितीकरणासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या पाठपुराव्याला यश मिळाल्याने समग्र शिक्षा कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या निर्णयामुळे हजारो कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना भविष्यातील स्थैर्याची आशा निर्माण झाली आहे.

यावेळी मंत्री पंकज भोयर यांनी समग्र शिक्षा अभियानातील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या कार्याचे कौतुक केले. विद्यार्थ्यांमध्ये 'राष्ट्र प्रथम' हा संस्कार रुजविण्यासाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी जागरूकपणे कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. भविष्यातही कर्मचाऱ्यांच्या अडचणी व प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी शासन सकारात्मक राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

समग्र शिक्षा कर्मचाऱ्यांचा नियमितीकरणाचा विषय शासन स्तरावर सातत्याने मांडण्यासाठी व आवश्यक ते सहकार्य केल्याबद्दल भाजप शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. भाजप ग्रामीण जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, किरण पाटील आणि चैतन्य (बापू) देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

समग्र शिक्षा कर्मचारी संघटनेच्या वतीने सोज्वल जैन, इंदुमती भोळे, सुष्मा भोळे, अलका धनेश्वर, मेघना कुलकर्णी यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## SKALEUP iBIZ 3.0 चा भव्य ग्रँड फिनाले 9 ऑगस्ट रोजी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जैन इंजिनिअर्स सोसायटी असोसिएशन (JESA) आणि JESA-NX यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित SKALEUP iBIZ 3.0 या स्टार्टअप, नवोपक्रम आणि उद्योजकता व्यासपीठाचा भव्य ग्रँड फिनाले रविवार, ९ ऑगस्ट रोजी दुपारी १.४५ वाजता रुक्मिणी हॉल, एमजीएम परिसर येथे होणार आहे.

JESA आणि JESA-NX यांच्या या प्रमुख उपक्रमाचे हे तिसरे पर्व असून, नवोदित उद्योजक व स्टार्टअप्सना उद्योगपती, गुंतवणूकदार, मार्गदर्शक, इन्क्युबेशन केंद्रे आणि व्यावसायिक नेत्यांशी जोडण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. सहभागी स्टार्टअप्सना व्यवसाय विस्तार, गुंतवणूक, विपणन, नेतृत्व आणि व्यवसाय मॉडेल याबाबत मार्गदर्शन मिळाले आहे.



ग्रँड फिनालेमध्ये निवड झालेले स्टार्टअप्स प्रतिष्ठित परीक्षक मंडळासमोर आपल्या व्यावसायिक संकल्पना सादर करतील. विजेत्यांना प्रथम १ लाख रुपये, द्वितीय ५० हजार रुपये आणि तृतीय २५ हजार रुपये अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत.

JESA चे अध्यक्ष प्रद्युम्न शाह यांनी सांगितले की, SKALEUP iBIZ हे केवळ स्पर्धेचे व्यासपीठ नसून युवा उद्योजकांना मार्गदर्शन, संधी आणि उद्योगजगताशी जोडणारा उपक्रम आहे. सचिव मयूर पाटनी यांनी यंदा स्टार्टअप्स, इन्क्युबेशन केंद्रे, उद्योगजगत, गुंतवणूकदार आणि शैक्षणिक संस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे सांगितले.

## एमजीएममध्ये राष्ट्रीय हातमाग दिन उत्साहात




हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या लिओनार्दो दा विंची स्कूल ऑफ डिझाइनमध्ये राष्ट्रीय हातमाग दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. भारताच्या समृद्ध हातमाग परंपरेचा गौरव, वस्त्रोद्योगाचा वारसा आणि शाश्वत फॅशनचा संदेश देणाऱ्या 'सूत्रसंगती - अ सेलिब्रेशन ऑफ हँडलूम हेरिटेज' या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. एच. एच. शिंदे, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, उपकुलसचिव डॉ. परमिंदर कौर, संचालिका शुभा महाजन यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

कुलपती अंकुशराव कदम यांनी विद्यार्थ्यांनी लिओनार्दो दा विंची यांच्या सर्जनशीलतेतून आणि परिपूर्णतेच्या ध्यासातून प्रेरणा घेऊन कलाकृती घडवाव्यात, असे आवाहन केले. तर कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ यांनी हातमाग उद्योग पर्यावरणपूरक असून शाश्वत विकास, हरित अर्थव्यवस्था आणि रोजगारनिर्मितीला चालना देतो, असे सांगितले.

## कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या नेतृत्वात मे. अमेया कंपनीतील कामगारांना 7200 रुपये पगारवाढ

### न्यु मॅरीटाईम अँड जनरल कामगार संघटनेचा या वर्षातील 9 वा पगारवाढीचा करार

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी नेहमी अग्रेसर असणारे राष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या नेतृत्वातील न्यु मॅरीटाईम अँड जनरल कामगार संघटना कामगारांना त्यांचे न्यायी हक्क मिळवून देण्यात नेहमीच अग्रेसर असते. या वर्षातील ९ वा करार करण्यात संघटना यशस्वी झाली आहे.

मे. अमेया CFS (PSA) खोपटे येथील सर्व्हेअर कामगारांचा पगारवाढीचा करार बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित होता. कामगार नेते महेंद्रशेठ घरत हे आपल्या नेतृत्व कौशल्याने अमेया कंपनीतील कामगारांना ७२०० रुपये पगारवाढ देण्यात यशस्वी झाले आहेत. तसा करार आज कामगार उपायुक्त रायगड यांच्या कार्यालयात सहाय्यक कामगार आयुक्त मनीषा काटकर यांच्या उपस्थितीत पार पडला.



या करारनाम्यानुसार कामगारांना प्रथमवर्षी तब्बल ८०% पगारवाढ म्हणजे ५७६०/- रुपये तर द्वितीय व तृतीय १४४० रुपये देण्याचे मान्य करण्यात आले आहे. त्याचबरोबर १४% बोनस ३ लाख रुपयांची मेडिक्लेम पॉलिसी देण्याचे मान्य करण्यात आले आहे. कामगारांना गणपती सणापूर्वी पगारवाढीच्या फरकाची रक्कम मिळणार आहे त्यामुळे कामगारांमधे आनंदाचे वातावरण आहे.

या प्रसंगी न्यु मॅरीटाईम अँड जनरल कामगार संघटनेचे कार्याध्यक्ष पि. के. रमण, सरचिटणीस वैभव पाटील, सचिव अरुण म्हात्रे, व्यवस्थापनातर्फे एचआर मॅनेजर नायर, कायदेशिर सल्लागार ॲड.सागर घरत, पर्ल पोर्टलाईन चे मॅनेजिंग डायरेक्टर जमशेद अश्रफ, मॅनेजर विशाल ठाकूर, कामगार प्रतिनिधी सुजित म्हात्रे, महेंद्र भगत, श्रेयस भगत, हितेंद्र म्हात्रे, अक्षय ठाकूर, कुलदीप भगत, प्रशांत ठाकूर, ऋतुराज गावंड, मनिष भगत, नवनित ठाकूर, राम ठाकूर, विलास थळे, विनय म्हात्रे आदी उपस्थित होते.

## सोयगाव विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण आ. सत्तार यांच्या हस्ते संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.७ ऑगस्ट :** सोयगाव शहराच्या विकासाला गती देणाऱ्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते सोमवार दि.3 रोजी उत्साहात संपन्न झाले. आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकारातुन यावेळी जवळपास 83 लाख रुपयांच्या मंजूर निधीतून भवानी माता मंदिरासमोरील सामाजिक सभागृहाचे भूमिपूजन,खंडेराव महाराज मंदिर येथील सामाजिक सभागृहाचे लोकार्पण, वॉर्ड क्रमांक 15 मधील दिलीप बिर्ला यांच्या दुकानापासून ते अस्लम पिंजारी यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे लोकार्पण, तसेच नवीन रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन अशा विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले.



याप्रसंगी आमदार अब्दुल सत्तार यांनी नागरिकांशी संवाद साधताना सांगितले की,सोयगाव शहराचा सर्वांगीण विकास हा आपला ध्यास असून नागरिकांना दर्जेदार पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडून अधिकाधिक निधी आणण्याचे काम सातत्याने सुरू आहे.सोयगावच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही अशी ग्वाही त्यांनी याप्रसंगी दिली.यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर (आबा) काळे, नगराध्यक्षा आशाबी तडवी,शिवसेना तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण,शहरप्रमुख संतोष बोडखे,युवासेना पदाधिकारी कुणाल राजपूत,अमोल मापारी,मुख्याधिकारी संभाजी देशमुख,शिवसेना गटनेते अक्षय काळे,नगरसेवक कादिर शहा,रउफ शेख,राजू दुतोंडे,दीपक पगारे,गजानन माळी,किशोर मापारी,अशोक खेडकर,भगवान जोहरे,हर्षल काळे,लतीफ शहा,रमेश गावंडे,समद शहा,रउफ देशमुख, दिलीप बिर्ला,रमेश चौधरी,संदीप चौधरी,वामन जावळे आदींसह पदाधिकारी,कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण यांची अक्का महाराज यांनी भेट घेऊन दिले निमंत्रण

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रतिनिधी. छत्रपती संभाजी नगर येथील कार्यक्रमात भेट घेऊन सत्कार करण्यात आला व श्री क्षेत्र वेरूळ या ठिकाणी असलेल्या मच्छिंद्रनाथ आश्रम येथे भेट द्यावी असे सद्गुरु अक्का महाराज . च्या वतीने भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे पंचायत समितीचे माजी सभापती तथा सदस्य दिनेश अंभोरे विकास कापसे उद्योजक इसाराम मातकर ह भ प नारायण भांबर्डे संतोष करपे . या प्रसंगी माजी केंद्रीय मंत्री भागवत जी कराड महानगरपालिकेचे महापौर समीर भैय्या राजुरकर आमदार संतोष दानवे आमदार अनुराधा ताई चव्हाण माजी मंत्री बबनराव लोणीकर मा आ संजय केनेकर माजी महापौर बापू घडामोडे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती



## धर्मादाय आयुक्तांचे निर्देश: गणेशोत्सव आणि दुर्गा उत्सव मंडळांना कायमस्वरूपी नोंदणी बंधनकारक

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आगामी सार्वजनिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव आणि दुर्गा उत्सव मंडळांनी आपली नोंदणी आता तातडीने कायमस्वरूपी करून घेणे बंधनकारक करण्यात आले असून, तसे स्पष्ट आवाहन धर्मादाय सह आयुक्त कार्यालयाकडून करण्यात आले आहे. दरवर्षी उत्सव काळात वर्गणी गोळा करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ४१ (क) नुसार शेकडो अर्ज परवानगीसाठी दाखल केले जातात.

यामुळे प्रशासकीय यंत्रणेवरील ताण वाढण्यासोबतच मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनाही दरवर्षी विनाकारण चक्रा माराव्या लागतात. मात्र, ज्या मंडळांनी कायदेशीर संस्था नोंदणी अधिनियमांतर्गत आधीच कायमस्वरूपी नोंदणी केली आहे, त्यांना दरवर्षी ही परवानगी घेण्याची कोणतीही कायदेशीर आवश्यकता भासत नाही. या नियमाची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

## तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्हमध्ये 'ओपन जिम'चा भव्य लोकार्पण सोहळा संपन्न!

**छत्रपती संभाजीनगर :** आपल्या तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह असोसिएशनच्या पाठीमागील गार्डनमध्ये रहिवाशांच्या आरोग्य आणि सुदृढतेसाठी *ओपन जिम* मंजूर करण्यात आली होती. याचे काम आता पूर्ण झाले असून, आज दिनांक ०६-०८-२०२६ रोजी या ओपन जिमचा लोकार्पण सोहळा अतिशय उत्साहात संपन्न झाला

**अथक पाठपुराव्याला यश**

विधान परिषदेच्या आमदार तथा शिवसेना सचिव *आदरणीय डॉ.मनिषाताई कायंदे* यांच्या आमदार निधीतून ही ओपन जिम मंजूर करण्यात आली होती. यासाठी आपल्या असोसिएशनच्या सदस्या, माजी अध्यक्षा तथा माजी नगरसेविका *सौ. लक्ष्मी किरण नरहिरे* यांनी अथक पाठपुरावा केला. त्यांनी स्वतः मुंबई येथे जाऊन मनीषाताई कायंदे यांची ३-४ वेळा भेट घेतली आणि आपल्या सोसायटीसाठी ही हक्काची सुविधा आणली.





**ज्येष्ठांच्या हस्ते उद्घाटन**

आज या ओपन जिमचे लोकार्पण टि.एस.इ. मधील *वेंकटरमना महिला भजनी मंडळ व ज्येष्ठ नागरिकांच्या* शुभहस्ते करण्यात आले. या ऐतिहासिक प्रसंगी असोसिएशनमधील सर्व सदस्य व रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यांचे लाभले मोलाचे योगदान

**ओपन जिम भूमीपूजन:-** श्री. संग्रामजी पटारे

**सहकार्य व देखरेख :** ॲड. राम हरपाळे, श्री प्रशांत बंड,श्री. शशिकांत सोनवणे, श्री अजयजी काबरा. ॲड.अनिकेत देशमुख,श्री. सचिन भामरे,

**कार्यालयीन कर्मचारी सहभाग:** संदीप पवार, मुक्तार पठाण, मोतीचूर मामा, गणेश खंडागळे

आपल्या सोसायटीच्या वैभवात भर घालणाऱ्या या सुंदर सुविधेबद्दल डॉ.मनिषाताई कायंदे आणि सौ. लक्ष्मीताई नरहिरे यांचे संपूर्ण तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह परिवारातर्फे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

"चला,आरोग्याकडे पाऊल टाकूया... ओपन जिमचा लाभ घेऊया!" चा जयघोष करण्यात आला.

**मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010**

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911